Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV ISSUE-IX Sept. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# जैन श्रावक रामभाऊ आळंदकरांचे हैदराबाद मुक्तीलढयातील योगदान

**शाहुराज यादव**
एम. ए.(इतिहास) नेट.
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर.

**प्रस्तावना:**

जगातील अनेक देशामध्ये स्वदेशभक्तांनी परकीयांपासुन स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी प्रखर स्वरूपाचे लढे दिले त्याचप्रमाने भारतीयांनीही आपली स्वातंत्र्य प्राप्तीची इच्छा पुर्ण करण्यासाठी कठीण संघर्ष केला. त्यातून भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले तरी कांही संस्थानात मात्र स्वकीय सत्ताधिशाविरोधातील संघर्ष अतिशय कठीन होता. त्यामध्ये हैदराबाद संस्थानाचा उल्लेख केला जातो. हैदराबाद मुक्ती लढाही आधुनिक भारताच्या इतिहासातील एक दैदिप्यमान घटना मानली जाते. मराठवाडयाला निजामी जोखडातून मुक्त करण्यासाठी अनेकजन लढत होते. त्यामध्ये मराठवाडयातील जैन श्रावकांनीही आपले महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे आणि अशा जैन श्रावकामध्ये रामभाऊ आळंदकर यांनी मौलाचे कार्य केलेले दिसते.

- **विषय निवडीचा उद्देश :**

भारतीय स्वातंत्र्य चळवळी प्रमाणेच हैदराबादचा मुक्तीसंग्राम हाही भारतातील एक प्रेरणादायी पर्व मानले जाते आणि अशा लढयामध्ये मराठवाडयातील रामभाऊ रूकोबा आळंदकर यांचे योगदान मोलाचे आहे त्यामुळे त्यांच्या कार्याचा आढावा घेण्याच्या अनुषंगाने ही विषय निवड केलेली आहे.

- **संशोधन उद्दिष्टये :**

१. हैदराबाद मुक्ती लढयात मराठवाडयातील जैन श्रावकांची भूमिका समजून घेणे.
२. हैदराबाद मुक्ती लढयातील रामभाऊ आळंदकरांचे योगदान याचा आढावा घेणे.

- **संशोधन पध्दती :**

प्रस्तुत विषयाच्या अनुषगाने संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे मुलाखत पध्दती , संदर्भ पध्दतींचा वापर केलेला आहे.

हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम हा भारतातील अतिशय कठीण संग्राम मानला जातो त्यामध्ये उल्लेखनिय कार्य करणारे मराठवाडयातील जैन श्रावक रामभाऊ रूकोबा आळंदकर हे अतिशय हिरिरीने यात सहभागी झाले होते श्री रामभाऊ रूकोबा आळंदकर हे अहमदपूर तालुक्यातील सावरगाव रोकडा या गावचे रहिवाशी होते हे गाव साधारणतः एक हजार लोकवस्तीचे होते. हैदराबाद संस्थानातील अहमदपूर हा तालूका तत्कालिन बिदर जिल्हयाचा एक भाग होता. या गावात जैनांचे केवळ एकच घर होते ते आळंदकरांचे होय. रूकोबा आळंदकर हे व्यावसायाने व्यापारी होते. सावरगाव रोकडा हे खेडेगाव आसल्याने रामभाऊंचे शिक्षण हे फक्त व्यावहारापूरते झाले आणि ते ही खाजगीत. रामभाऊंचे लग्न इंदिराबाई यांच्याशी झाले. लग्नानंतर निजामी रझाकारांच्या अत्याचाराने व्यथीत झालेले रामभाऊ स्वातंत्र्यासाठी संघर्षाची तयारी करू लागले आणि अशा वेळी त्याना उंबरगा कोर्ट येथील स्टेट कॉंग्रेसचे कार्यकर्ते कालीदासरावांचे मार्गदर्शन प्राप्त झाले त्यातून त्यांचे कार्य विस्तारत गेले निजामशाहीत जाहीर सभांना बंदी होती. त्यामुळे स्वामी रामानंद तीर्थाकडून येणारे आदेश लोकांपर्यत पोहचविणे, सभा घेणे, गुप्त पणे लोकांना जागृत करणे व त्यांना सत्यागृहात भाग घेण्यासाठी प्रोत्साहित करणे आदि कामे रामभाऊ करत रझाकारांच्या दडपशाहीला न जुमानता ते निजामाचा निषेध , निदर्शने करत खेडोपाडी फिरत.

निजामाविरोधात त्यांनी ऑगस्ट १९४७ साली सावरगाव रोकडा येथे यात्रेतील लोकांना जमवून निजाम विरोधात घोषणा दिल्या आणि सत्यागृह घडवून आणला ही बातमी येथील पोलिस पाटलाने कोतवलामार्फत अहमदपूर पोलिस स्टेशनला कळवली त्यानंतर चार - सहा दिवसांनी ऐन रक्षाबंदनाच्या दिवशी बहिणीने ज्या हातावर रामभाऊ आळंदकरांना राखी बांधली त्या हातांना पोलिसांनी बेडी घातली. त्यांच्यासोबत त्यांच्या इतर बारा सहकाऱ्यानाही पकडण्यात आले. त्या सर्वाना चार दिवस पोलिस कोठडीत आणि चार दिवस

मॅजीस्ट्रेट कोठडीत ठेवण्यात आले. दि. २ सप्टे १९४७ या दिवशी सर्वांना वीस महिन्याची सश्रम कारावासाची शिक्षा सुणावण्यात आली. यासर्वांना प्रथम बीदर येथे दिड महिने व नंतर गुलबर्गा कारागृहात ठेपण्यात आले. तेथे प्रतेकाकडून १८ शेर दळण दळून घेतले जात होते तर काहींना घाण्यालाही जुंपले जात ही स्थिती स्वामीजींना समजल्यानंतर त्यांनी प्रत्याक्ष जेलमध्ये त्यांची भेट घेतली व निजाम सरकारेडे याचा निषेध व्यक्त केला. त्यामुळे रामभाऊ व इतर सत्यागृहींचा छळ - त्रास थोडा कमी झाला. शेवटी जेलमध्ये साडे तेरा महिने घालवल्यानंतर सप्टे. १९४८ मध्ये झालेल्या पोलिस ॲक्शन नंतर रामभाऊ आळंदकराना बंधनमुक्त करण्यात आले.

देशासाठी घरादाराची पर्वा न करणाऱ्या रामभाऊनी जेलमधुन मुक्तता झाल्यानंतर आपले पुढील आयुष्य व्यवसायानिमित्त लातूर येथे घालवले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पुढील काळात त्यांना स्वातेत्र्यसैनिकाचे प्रमाणपत्र प्राप्त झाले व पेन्शनही मिळू लागली. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्ते ताम्रपत्र देवून रामभाऊ आळंदकराचा सन्मान झाला. राज्यासोबतच त्यांना केंद्र शासनाचीही पेन्शन मिळत होती तरीही देशासाठी कांहीतरी करण्याची तळमळ त्यांना स्वस्थ बसु देत नव्हती पण वृध्दत्वामुळे त्यांना आपल्या इच्छांना मुरड घालावी लागली .

- **निष्कर्ष :**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक दैदिप्यमान पर्व असणाऱ्या हैदराबाद मुक्तीलढयामध्ये सध्याच्या मराठवाडयातील सावरगाव रोकडा या अहमदपूर तालूक्यातील गावचे रहिवासी असणाऱ्या जैन श्रावक श्री रामभाऊ रूकोबा आळंदकर यांनी रझाकारांच्या विरोधात लोकांना जागृत करतानाच निजामी राजवटीतून मुक्त होण्यासाठी स्वत: सत्यागृह करत, छळ, अत्याचार सहन करत आणि स्वत:च्या संसाराची पर्वा सोडून अतिशय मोलाची कामगीरी बजावली होती हे लक्षात येते.

- **संदर्भ ग्रंथ :**

१. मकदुम डी. डी. (संपा), भारतीय स्वातंत्र्य लढयातील जैनांचे योगदान, रत्नत्रय हिट एक्सचेंजर्स, मुबई. ११९९
२. कठारे अनिल (डॉ.), मराठवाडयाचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड .
३. अहमदपूर तालूक्यातील स्वा. सैनिक रामभाऊ रूकोबा आळंदकर - अप्रकाशीत
४. लोखंडे चंद्रशेखर (डॉ.), हैद्राबाद मुक्तिसंग्राम का इतिहास, आर्य धर्मार्थ ट्रस्ट, हिण्डौन सिटी. २००४
५. देव प्रभाकर (डॉ.), हैद्राबाद मुक्तिसंग्राम, मुद्रा ऑफसेट प्रिंटर्स, नांदेड .